# प्रारंभिक अधिसूचना

क्र.उजिभू/मं.अं./कावि-     /२०१९
उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्र.२
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर
दिनांक        /०५/२०१९

**भुमी संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम ११(१) खालील अधिसूचना**

ज्याअर्थी भुमीसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापणा करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनीयम २०१३ (३० OF २०१३) च्या कलम ३ मधील पोट कलम (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाने महसुल व वनविभाग अधिसुचना क्रमांक **MIS-११/२०१४/C.R.७७/A-२** दिनांक **१९ जानेवारी २०१५** (यानंतर यापुढे याला सदर्हु अधिसुचना संबोधण्यात यावे) अन्वये सार्वजनिक प्रयोजनार्थ जमिन संपादन करतांना (सदर्हु कायद्याच्या कलम ३ मधील पेटकलम (झअ) नुसार ) जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा जास्त नसलेल्या जमिनीच्या बाबतीत त्या जिल्हयाचा जिल्हाधिकारी यांना या कायद्या अंतर्गत जमिन संपादन करण्यास शासनाच्यावतीने समुचित शासन म्हणुन घोषित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी या अधिसुचनेनूसार जिल्हाधिकारी यांना शासनाच्या वतीने समुचीत शासन म्हणुन घोषित करण्यात आले आहे, त्याअर्थी अनुसुची I मध्ये दर्शविलेल्या जमिनी (या पुढे याच **"उक्त भूमी"** असा उल्लेख करण्यात येईल) अनुसूची II मध्ये नमुद केलेल्या सार्वजनिक प्रयोजनाकरीता आवश्यक आहे किंवा आवश्यक असल्याचा संभव आहे. (यापुढे याचा उल्लेख **"उक्त सार्वजनिक प्रयोजन"** असा करण्यात येईल) याबाबत जिल्हाधिकारी नागपूर यांची समुचित शासन म्हणुन खात्री झाल्यामुळे सदर्हु कायद्याच्या कलम ११ च्या पोटकलम १ नुसार सार्वजनिक कामाचे प्रयोजनासाठी जमिन संपादन करण्यात येते असे अधिसूचित करणे आवश्यक आहे).

आणि ज्याअर्थी सदर्हु भुमीसंपादन कायद्यानुसार सार्वजनिक प्रयोजनार्थ भुमी संपादीत करतांना भुधारकास विस्थापित करण्याचे कारण सोबत जोडलेल्या अनुसूची III मध्ये नमुद केलेले आहे.

आणि ज्याअर्थी भुमीसंपादन कायद्याअंतर्गत सार्वजनिक प्रयोजनार्थ भुमीसंपादन करतांना सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश सोबत जोडलेल्याा अनुसूची IV मध्ये नमुद केलेला आहे.

आणि ज्याअर्थी या भुमीसंपादन कायद्याचे कलम ४३ पोट कलम (१) नुसार विस्थापितांचे पुनर्वसन व पुर्नस्थापना करण्याकरीता सोबत जोडलेल्या अनुसूची V मध्ये प्रशासकाचे विवरण नमुद केलेले आहे. (प्रशासकाची नियुक्ती आवश्यक असल्यास अनुसूची V मध्ये माहिती देणे आवश्यक आहे.

त्याअर्थी सदर्हु कायद्याच्या कलम ११ चे पोट कलम (४) नुसार अधिसुचना प्रसिध्द केल्याच्या दिनांका पासुन सदर्हु भुमी कायद्याच्या प्रकरण ४ खाली कार्यवाही पुर्ण होईपर्यंत कोणतीही व्यक्ती उक्त जमिनीचा अथवा जमिनीच्या भागाचा

कोणताही व्यवहार करणार नाही किंवा कोणताही व्यवहार करविणार नाही किंवा अश्या जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशाप्रकारे अधिसूचित केलेल्या भुमीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट कलमाच्या अमलबजावणी मधुन अशा भुमी मालकास सुट देऊ शकेल.

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची अथवा क्षतीची जिल्हाधिकारी व्दारे भरपाई देण्यात येणार नाही.

पुन्हा असे घोषित करण्यात येते की, सदर्हु भुमी संपादन कायद्याचे कलम ११ च्या पोट कलम (५) अन्वये जिल्हाधिकारी भुमी संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१३ (यापुढे ज्याचा उल्लेख **"उक्त नियम"** असा करण्यात येईल) चे नियम १० उपनियम (३) अन्वये भुमीअभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेतील.

त्याअर्थी समुचीत शासन म्हणुन जिल्हाधिकारी सदर्हु कायद्याचे कलम ३ पोट कलम (ग) अन्वये उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्र.२ विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना जिल्हाधिकारी यांची कर्तव्ये पार पाडण्यास प्राधिकृत करीत आहे.

**अनुसुची I**
**जमीनीचे वर्णन**

भू.प्र.क्र. १५/अ-६५/२०१८-१९

गावाचे नाव :- **परसोडी**, तालुका:- भिवापूर, जिल्हा:- नागपूर, प.ह.न. **७८**

| अ.क्र. | सर्व्हे क्रं. किंवा गट क्रं. | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) हे.आर मध्ये |
|---|---|---|
| **अ** | **पेंढरी मोखाळा वितरीकेवरील पुच्छ लघुकालवा** | |
| १ | ८१ | ०.०१ |
| | **एकुण** | **०.०१** |
| **ब** | **पेंढरी मोखाळा पुच्छ लघुकालव्यावरील उपलघुकालवा क्र.१** | |
| १ | २६ | ०.१२ |
| | **एकुण** | **०.१२** |
| **क** | **पेंढरी मोखाळा पुच्छ लघुकालव्यावरील उपलघुकालवा क्र.२** | |
| १ | ४६ | ०.७२ |
| २ | ४९ | ०.०४ |
| ३ | ५४ | ०.३४ |
| | **एकुण** | १.१० |
| | **एकुण संपादित क्षेत्र (अ+ब+क)** | **१.२३** |

## अनुसुची II

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाचे विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | : | गोसेखुर्द प्रकल्प |
| प्रकल्पाचे कामाचे विवरण | : | मोखाबर्डी उपसा सिंचन योजणेअंतर्गत पेंढरी मोखाळा वितरीकेवरील पुच्छ लघु कालवा पेंढरी मोखाळा पुच्छ लघुकालव्यावरील उपलघुकालव क्र.१ व उपलघुकालवा क्र.२ चे बांधकामाकरीता भुसंपादनाचा प्रस्ताव. |
| प्रकल्पाचे समाजाला होणारे फायदे | : | गोसीखुर्द प्रकल्पामुळे सिंचन क्षमता २५०८१९ हे.आर. (आर्थिक,रोजगार,पायाभूत सुविधा, व इतर) आहे. त्याचा लाभ सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंदे व शेतजमिनीला होणार आहे. |

## अनुसुची III

प्रकल्प बाधितांना विस्थापित करणे

आवश्यक असल्याबाबतची कारणे : निरंक

## अनुसुची IV

सामाजिक परिणाम निर्धारणचा सारांश : पर्यावरन व वन मंत्रालय भारत सरकार नवि दिल्ली यांचे कार्यालयीन मेमोरन्डम क्र. **J-११०१६(७)/८४-EN५/१A** दिनांक ०३ फेब्रु १९८८. अन्वये या प्रकल्पास पर्यावरन विभागाचे नाहरकत मिळालेले असल्याने नविन भूसंपादन कायदा २०१३ कलम (६) मध्ये अन्वये सामाजिक परिणाम निर्धारणातुन सुट आहे.

## अनुसुची IV

## नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल

अ. अधिका-याचे नाव पदनाम :- निरंक

ब. अधिका-याचे कार्यालयीन पत्ता :- निरंक

क. ज्या अधिसूचनेव्दारे प्रकासकाची नियुक्ती करण्यात आली त्या अधिसूचनेचे विस्तृत विवरण (निर्गमित करण्यापुर्वी भरावे)

विशेष नोंद :- भूसंपादित जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्र.२ विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्या कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

ठिकाण :- नागपूर

दिनांक :- /०५/२०१९

**उपजिल्हाधिकारी**
**भूसंपादन क्र.२ वि.पा.वि.म. नागपूर**